ल. पा. तलाव वड्री, ता.यावल, जि.जळगाव, या योजनेस द्वितीय सुधारित प्रशासकिय मान्यता प्रदान करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन निर्णय क्रमांकः सुप्रमा -१०१३/(४२ /२०१३) लपा
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: - १९ सप्टेंबर, २०१९.

पहावे:

१)कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव यांचे पत्र क्र.जा.क्र.तापाविम/प्रशा-५/१५४/सन-२०१२,दि.०७.०१.२०१३
२) कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव यांचे पत्र क्र. जा.क्र.तापाविमं/प्रशा-५/५९२६/सन-२०१९,दि. ०३.०९.२०१९
३)वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांचे पत्र क्रमांक व्यअस-२०१९/प्र.क्र.४२/अर्थसं-२ दिनांक १७.०९.२०१९

प्रस्तावना :

लपा तलाव वड्री, ता.यावल, जि.जळगाव या योजनेस शासन निर्णय क्र.लपात/६८७/१६८५/लपा-१, दि.०५/०५/१९८८ अन्वये एकूण ८१.७९ लक्ष (दरसूची सन१९८६-८७) किंमतीस मूळ प्रशासकीय मान्यता आहे. तसेच तापी पाटबंधारे विकास महामंडळ,जळगाव निर्णय क्र.तापाविम /कासं/प्रवि४/सुप्रमा/२०/लपायो/९९,दि.०६/०४/१९९९,अन्वये एकूण रु. ४००.७१ लक्ष (दरसूची सन १९९७-१९९८) किंमतीस प्रथम प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

सदर प्रकल्पाचे काम सुरु असतांना दरसूचीतील वाढ,भूसंपादन किंमतीतील वाढ, परिमाणातील वाढ, नविन तरतूदीमुळे वाढ तसेच अनुषंगिक खर्चामुळे झालेली वाढ या कारणांमुळे वाढ होत असल्यामुळे या योजनेस द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करणे आवश्यक झाले आहे.

शासन निर्णय :

आता या निर्णयान्वये लपा तलाव वड्री, ता.यावल, जि.जळगाव, या योजनेस सन २०१४-१५ च्या दरसूचीवर आधारित एकूण रुपये १०२३.३२ लक्ष (अक्षरी रुपये दहा कोटी तेवीस लाख बस्तीस हजार फक्त) या किंमतीस द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे. उपशिर्षवार तरतुदींचा गोषवारा सोबतच्या परिशिष्टामध्ये जोडला आहे.

२. सदर द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यता खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

२.१) लगतपूर्व प्रशासकीय मान्यता प्राप्त किंमतीपेक्षा अधिक खर्च शासन मान्यतेविना केला असल्यास प्रथमत: जबाबदारी निश्चित करुन खर्च नियमित करण्याची कार्यवाही करावी.

२.२) धरणाच्या मुख्य विमोचकातून दीर्घ काळ होत असलेल्या गळतीबाबत उपाययोजना न करता विलंबाने प्रस्ताव पाठविल्याबाबत जबाबदारी निश्चित करुन कारवाई करावी.

२.३) या योजनेची कामे जून, २०२१ पर्यंत पूर्ण करावीत.

२.४) प्रकल्पाची अंमलबजावणी करतांना प्रचलित शासन निर्णय,नियम, CVC तत्वे, वित्तीय मर्यादा, विहित निविदा कार्यपद्धती अनुसरणे आवश्यक राहील.

२.५) या प्रकल्पासंदर्भात आधीच्या कालावधीत झालेल्या आर्थिक अथवा कार्यपद्धतीमधील अनियमितता या मान्यतेमुळे नियमित झाल्या असे म्हणता येणार नाही.

२.६) ही सुधारित प्रशासकीय मान्यता म्हणजे अहवालातील तांत्रिक बाबी, निविदा विषयक क्षेत्रिय निर्णय किंवा अनियमितता या निर्णयाव्दारे नियमित केल्या आहेत, असे नव्हे.

२.७) या योजनेबाबत चालू असलेल्या अथवा प्रस्तावित विभागीय चौकशीची कार्यवाही पुढे चालू राहील. सदर सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याच्या निर्णयामुळे विभागीय चौकशीच्या कार्यवाहीस कोणतीही बाधा पोहचणार नाही.

३. या योजनेच्या कामावरील खर्च मागणी क्र.आय-५ प्रधान लेखाशिर्ष,"४७०२लहान पाटबंधाऱ्यावरील भांडवली खर्च, (८०) सर्वसाधारण, (१९०) सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमांतील गुंतवणूका(००),(००)(०३) तापी पाटबंधारे विकास महामंडळास भागभांडवली अंशदान (लहान पाटबंधारे) (कार्यक्रम),५४-गुंतवणुका (४७०२ ४९२७)" या लेखाशिर्षाखाली खर्ची घालावा व शासनाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

४. हा शासन निर्णय नियोजन विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.८२/का-१४३४, दि.२१/०८/२०१९ तसेच वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.२२०/व्यय-१२,दि.२९/०८/२०१९ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार व्यय अग्रक्रम समितीने दि. ०६/०९/२०१९ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत दिलेल्या मंजुरीनुसार व संदर्भ क्र.३ नुसार याबाबतच्या निर्गमित केलेल्या इतिवृत्तानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. या योजनेस प्रदान करण्यात आलेली द्वितीय सुधारित प्रशासकिय मान्यता प्रशासकीय मान्यतेच्या नोंदवहीमध्ये (२०२/२०१९) अनुक्रमांकावर नोंदण्यात आली आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९१९१११९४३१६२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dharane Mallikarjun Irappa

Digitally signed by Dharane Mallikarjun Irappa
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=42153c779eba7d6ca17364b6d37857b105b20a01d36c767c7ed1d7d278837bd7, serialNumber=8a9bdce987e31fe4e079969a0eb71bce94df0f9984bd752cc203bcd86349bbb5, cn=Dharane Mallikarjun Irappa
Date: 2019.09.19 14:17:52 +05'30'

(म.ई.धरणे)
उप सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य.

३. सर्व मा.मंत्री/मा.राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य., मुंबई.

४. विरोधी पक्ष नेते विधान परिषद / विधानसभा.

५. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई/नागपूर.
६. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा परिक्षा), मुंबई/नागपूर.
७. वित्त विभाग (व्यय-१२), मंत्रालय, मुंबई ३२
८. नियोजन विभाग (कार्यासन १४३४), मंत्रालय, मुंबई ३२.
९. कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ,जळगाव
१०. मुख्य अभियंता, तापी पाटबंधारे विकास महामंडळ,जळगाव.
११. आंतर वित्त सल्लागार व उप सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. जिल्हाधिकारी, जळगाव.
१३. अधीक्षक अभियंता, जळगाव पाटबंधारे प्रकल्प मंडळ,जळगाव.
१४. अर्थशाखा १/२ (२ प्रती), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
१५. विभागीय संपर्क अधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
१६. लपा कार्यासन संग्रहार्थ.

परिशिष्ट

सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्तावित किंमतीचा उपशीर्षनिहाय तरतुदीचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे

ल पा तलाव वड्री, ता.यावल, जि.जळगाव,

शासन निर्णय क्रमांक :- सुप्रमा -१०१३/(४२/२०१३) लपा, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक :- १९ सप्टेंबर, २०१९

(रु. लक्ष)

अ.क्र.	तपशिल	**द्वितीय सुधारित प्रशासकिय मान्यतेनुसार तरतुद (दरसूची २०१४-१५)**
१	अ- प्राथमिक	२.२०
२	ब- जमीन	१६.११
३	क- कामे, धरण, सांडवा	४५४.६४
४	डी- विमोचक	२०.३१
५	के- इमारती	२.००
६	एम- वृक्षारोपण	३.३५
७	ओ- संकिर्ण	९.०७
८	पी- परिरक्षण खर्च	११.६३
९	आर- दळणवळण	१०६.७७
१०	मुख्य कालवा व वितरीका	३०५.९६
	एकूण रुपये	९३२.०४
	अनुषंगिक खर्च	९१.२८
	एकूण एकत्रित	**१०२३.३२**